आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२२ ऑगस्ट २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ४ वर्षांखालच्या मुलांसाठी क्लोर फिनरामाइन मॅलिएट आणि फेनिलेफ्राइन हायड्रोक्लोराइड हे दोन घटक एकत्र असलेल्या सर्व औषधांवर केंद्र सरकारकडून बंदी

- अमली पदार्थांविरोधातल्या लढ्यात राज्य सरकार आणि राज्यातल्या सर्व यंत्रणा मागे हटणार नाहीत अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमाची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागानं जारी केल्या नव्या मार्गदर्शक सूचना

- काँग्रेस नेते राहुल गांधी आज छात्रों की गूँज कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना संबोधित करणार

आणि

- बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात, त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना कांस्यपदक

<><><><><>

क्लोर फिनरामाइन मॅलिएट आणि फेनिलेफ्राइन हायड्रोक्लोराइड हे दोन घटक एकत्र असलेल्या सर्व औषधांचं ४ वर्षांपेक्षा लहान मुलांसाठी उत्पादन, विक्री आणि वितरणावर सरकारनं बंदी घातली आहे. आरोग्य मंत्रालयानं यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे. 'चार वर्षांखालील मुलांना ही औषधं देऊ नयेत', असा स्पष्ट इशारा या औषधांच्या वेष्टनावर नमूद करणं, अनिवार्य करण्यात आलं आहे. या वयोगटातल्या मुलांसाठी ही औषधं हानीकारक असू शकतात आणि यापेक्षा जास्त सुरक्षित असलेले पर्याय उपलब्ध आहेत, असंही सरकारनं म्हटलं आहे.

<><><><><>

अमली पदार्थांविरोधातल्या लढ्यात राज्य सरकार आणि राज्यातल्या सर्व यंत्रणा मागे हटणार नाहीत अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नशामुक्त नवी मुंबई अभियानाअंतर्गत कॅम्पस कनेक्ट या मोहिमेचा प्रारंभ झाला, त्यावेळी ते

बोलत होते. समाजाच्या सोबतीनं सरकार व्यसनाधीनतेला पराभूत करून दाखवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

'नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत' सर्वत्र अमली पदार्थांविरोधात सुरू असलेलं युद्ध युवा शक्तीचं, विद्यार्थ्यांचं असून, आपल्या सगळ्यांच्या अस्तित्वाची लढाई आहे, असं ते म्हणाले. व्यसनाच्या आहारी गेलेल्यांना मदतीची आवश्यकता आहे, हे समाजानं समजून घ्यायला हवा, असं आवाहन त्यांनी केलं. नागरिकांनी अमली पदार्थांबद्दल मिळालेली माहिती पोलिसांना कळवण्यात पुढाकार घ्यायला हवं असंही ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना नशामुक्तीची शपथही दिली.

नवी मुंबई आणखी सुरक्षित करण्यासाठी सीबीडी बेलापूर इथं प्रहारी इंटिग्रेटेड सीसीटीव्ही कमांड सेंटरचं उद्घाटनही मुख्यमंत्र्यांनी आज केलं.

**<><><><><>**

जमीन शेतीयोग्य करण्यासाठी लागणाऱ्या कुठल्याही साहित्यासाठी शेतकऱ्यांची अडवणूक करायची नाही, असे स्पष्ट आदेश प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली. ते नागपूर इथं वार्ताहरांशी बोलत होते. शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार भक्कमपणे उभं आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

***होल्ड... बाईट- चंद्रशेखर बावनकुळे***

**<><><><><>**

राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रमाची आणखी प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागानं १ सप्टेंबरपासून नव्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यानुसार राज्यातल्या सर्व १ हजार १९६ बाल तपासणी पथकांचं प्रशासकीय नियंत्रण तालुका आरोग्य अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आलं आहे. अंगणवाडी आणि शाळांमधल्या बालकांची आरोग्य तपासणी, तपासणीची गुणवत्ता आणि आजारी बालकांना वेळेवर मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया मिळणं यावर यात भर दिला जाईल. उपसंचालक स्तरावरून रोज ५० पालकांशी थेट संपर्क साधून उपचारांची पडताळणीही केली जाणार आहे. तसंच या योजनेतल्या वाहनांना जीपीएस लावणंही बंधनकारक करण्यात आलं आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२२ ऑगस्ट २०२६ - शनिवार

**<><><><><>**

राज्य पोलीस दलात १० वर्षांची सेवा पूर्ण करून निवृत्त झालेल्या श्वानांना निवृत्तीनंतरही पोलीस दलातच ठेवण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. या श्वानांना सांभाळणारे कर्मचारीही त्यांच्यासोबतच राहतील. या श्वानांच्या आहाराचा आणि देखभालीचा सर्व खर्च राज्य शासनाचा गृह विभाग करेल. श्वानांनी पोलीस दलासाठी दिलेलं योगदान लक्षात घेऊन, त्यांची योग्य ती काळजी घेणं ही शासनाची जबाबदारी आहे, असं मुख्यमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नाशिक-त्र्यंबकेश्वर इथं पुढच्या वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागानं डिसेंबरपर्यंत सर्व व्यवस्था सज्ज ठेवण्याचे निर्देश राज्याचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज दिले. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. येणाऱ्या भाविकांची संभाव्य संख्या लक्षात घेऊन आवश्यक यंत्रसामग्री, औषधांचा पुरेसा साठा आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचं नियोजन आतापासूनच करावं, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

शंभरावं साहित्य संमेलन पुढच्या शतकाच्या साहित्यिक वाटचालीचा पाया घालणारं ठरावं अशी अपेक्षा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज व्यक्त केली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाबाबत राज्यातल्या विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंशी तसंच संबंधित यंत्रणांच्या प्रमुखां सोबत सामंत यांनी संवाद साधला. विद्यार्थी, नवोदित आणि ग्रामीण साहित्यिकांना व्यापक व्यासपीठ देत सर्वजण मिळून हे संमेलन ऐतिहासिक करूया, असं आवाहन सामंत यांनी यावेळी केलं. १००व्या साहित्य संमेलनातून सुरू झालेलं विद्यार्थी साहित्य संमेलन यापुढे दरवर्षी राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येईल असं त्यांनी सांगितलं. उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील दूरदृश्यप्रणाली द्वारे या संवादात सहभागी झाले होते. शंभरावं साहित्य संमेलन आणि विद्यार्थी साहित्य संमेलनं ही मराठी भाषेच्या संवर्धनाची मोठी संधी आहे.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी थोड्याच वेळात पुण्यात 'छात्रों की गूँज' या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना, विशेषतः विद्यार्थिनींना संबोधित करणार आहेत. यासाठी ते आज दुपारी पुण्यात पोहोचले. दरम्यान, भारतीय जनता पक्षानं या कार्यक्रमावर टीका केली आहे. या कार्यक्रमात गर्दी जमवण्यासाठी काँग्रेसनं सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना पैसे दिल्याचा दावा भाजपानं केला. त्यावर, जेन झीचा काँग्रेसला मिळणारा वाढता पाठिंबा बघून भाजपा घाबरली आहे, असं प्रत्युत्तर काँग्रेसनं दिलं.

दरम्यान, या कार्यक्रमाच्या नोंदणीच्या मुद्द्यावरून पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वसतीगृहाच्या आवारात भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघटना आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्यात काल मध्यरात्री झटापट झाली. यात काहीजण जखमी झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लाठीमार केला. अभाविपच्या तक्रारीवरून ५० ते ६० जणांविरुद्ध गुन्हे दाखल केल्याची माहिती शिवाजीनगर पोलिसांनी केली.

<><><><><>

साखरेच्या वाढत्या दरांच्या पार्श्वभूमीवर सणासुदीतली मागणी पूर्ण करण्यासाठी यंदाचा गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्यासाठी सहकारी साखर कारखाने प्रयत्नशील आहेत. राज्य सरकारनं परवानगी दिल्यास लवकर गाळप सुरू करून बाजारात नवीन साखर उपलब्ध करून देऊ, असं राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी आज सांगितलं. सध्याच्या साखरेच्या दरवाढीचा सहकारी साखर कारखान्यांना विशेष फायदा झाला नसल्याचं महासंघानं म्हटलं आहे.

<><><><><>

तांत्रिक कामांसाठी पुणेस्थानक परिसरात उद्या सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेत नऊ तासांचा ब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात फलाट क्रमांक तीन, चार, पाच आणिसहा वाहतुकीसाठी बंद राहतील. त्यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेससह सहा रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. प्रवाशांनी प्रवासापूर्वी एनटीएस ॲपवर रेल्वेगाड्यांचं अद्ययावत वेळापत्रक तपासून प्रवास करावा, असं आवाहन मध्य रेल्वे प्रशासनानं केलं आहे.

<><><><><>

अहिल्यानगर जिल्हा गुंतवणूक परिषदेचं उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालं. राज्य सरकार जिल्ह्यात नवीन उद्योग,

गुंतवणुकीसाठी पुढाकार घेत असून या उद्योगांना सुरक्षा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन खंबीरपणे उभं आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या महिला दुहेरीतलं भारताचं आव्हान आज संपुष्टात आलं. त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीला उपांत्य फेरीत चीनच्या अग्रमानांकित लिउ शेंग शू आणि तान निंग या जोडीकडून २१-१८, १३-२१, ८-२१ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे त्यांना कास्यपदकावर समाधान मानावं लागलं.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात काल रात्रीपासून पावसाची संततधार होती. आज सकाळीही जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. गेल्या चोवीस तासांत धानोरा तालुक्यात सर्वाधिक २३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल गडचिरोली तालुक्यात १७.२ मिलिमीटर पाऊस पडला.

<><><><><>

गेल्या २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली.

पुढच्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे.

//<><><><><>//